## प्रकरण पाचवे

## उ प सं हा र

## प्रकरण पाचवे

## उ प सं हा र

लोकमान्य टिळकांचे मुख्य ध्येय स्वराज्य संपादनाचे होते. त्यांनी भारतीय जनतेला स्वातंत्र्याची आणि त्यांच्यावरील अन्यायाची जाणीव करून दिली. सामाजिक सुधारणा विशिष्ट कालावधीमध्ये पूर्ण करणे अशक्य आहे. असा त्यांचा सामाजिक सुधारणांच्या बाबतीत दृष्टिकोन होता. त्यांनी सामाजिक सुधारणेला राजकीय सुधारणांच्या बरोबर स्थान न देता दुय्यम स्थान दिले. टिळकांनी सामाजिक सुधारणेचे तत्व केसरी-मध्ये लिहिलेल्या अनेक लेखातून स्पष्ट होते. जोपर्यंत राष्ट्रीयत्वाचा अभिमान समाजामध्ये असतो तोपर्यंत समाज जागृत असतो. समाजरचना कशाही असल्या तरी तोपर्यंत राष्ट्राच्या उन्नतीला आड येत नाही. यासाठी आधी राजकीय स्वातंत्र्य मिळाले पाहिजे असे टिळकांचे मत होते. भारतातील राजकीय सत्ता भारतीयांच्या हाती असावी या आग्रहातून इंग्रजी सत्तेविषयीचे त्यांचे आकलन, राजनैतिक डावपेच यातूनच आधी राजकीय मग सामाजिक अशी भूमिका तयार झाली असावी. टिळक आणि आगरकर यांच्यातील मतभेद इहवादी सुधारणा की धर्मनिष्ठ सुधारणा याबाबत होता. सुधारक धर्मनिष्ठ आणि नि:स्वार्थी असल्यास राष्ट्रीय उन्नती होऊ शकेल असे टिळकांचे मत होते. समाजामध्ये बदल करत असताना खरोखरच समाजामध्ये बदल करण्याची आवश्यकता आहे का ? या विचाराबरोबरच जनमत विचारात घेणे टिळकांना आवश्यक वाटत होते.

भारतातील प्राचीन संस्कृतीचा वापर करून समाजामध्ये बदल घडवून आणण्याचा टिळकांनी प्रयत्न केला. धर्म आणि संस्कृतीचा उपयोग करून राष्ट्रीयत्वाची भावना जोपासता येईल. यावर त्यांचा विश्वास

होता. त्यासाठी शिवाजी महाराजांच्या स्वराज्याच्या संकल्पनेचा पुरस्कार केला. शिवाजी महाराज हे राष्ट्रीय ऐक्याचे प्रतिक आहेत. या महापुरुषाचे स्मरण हे राष्ट्रीयत्व कायम राखण्यास एक चांगले साधन आहे. यावर त्यांनी भर दिला. धर्मामध्ये परिवर्तन झाल्याशिवाय भारताच्या राष्ट्रीय एकतेला बळकटी येणार नाही. या विचारातून टिळकांनी राष्ट्रवादाला संस्कृतीचे स्वरूप दिले. राजकारणातील कर्तृत्वाने टिळकांना लोकप्रियता मिळाली. ताईमहाराज प्रकरणामध्ये टिळकांवर फौजदारी गुन्हा नंतर त्यांच्यावर राजद्रोहाची दोन खटले, सरकारी परवानगी शिवाय भाषणे करु नये, इतर चळवळ करु नये,लंडनला जाण्याचे परवाने एकदा रद्द करणे, लंडनला फक्त चिरोल खटल्याचे काम पाहावे अशी सरकारी मनाई टिळकांना अनेकदा होत होती. मात्र तेवढीच लोक-प्रियता टिळकांना मिळाली. याच लोकप्रियतेने त्यांना आर्थिक मदत मोठया प्रमाणात केलेली होती.

प्रस्तुत प्रबंधामध्ये टिळक आणि सामाजिक सुधारणांचा अभ्यास करण्यात आला आहे. टिळकांची सामाजिक भूमिका तपासून पाहून सामाजिक सुधारणांना त्यांनी विरोध का केला याची मीमांसा करुन मांडणी करणे हा प्रस्तुत लघु-शोध प्रबंधाचा उद्देश आहे. टिळकांनी विविध विषयावर दिलेले व्याख्यान, वृत्तपत्रातून लिहिलेले लेख, अग्रलेख या साधनाचा वापर करुन टिळकांच्या विचारांची मांडणी आणि विश्लेषण केले आहे.

पहिल्या प्रकरणामध्ये लोकमान्य टिळक यांच्या जीवनाच्या परिचयाचा थोडक्यात समावेश केला आहे. टिळकांच्या जन्मापासून ते टिळक आणि आगरकर यांच्यामध्ये मतभेद होऊन त्या दोघांची कार्यक्षेत्रे भिन्न झाली. इथपर्यंतचा आढावा घेतलेला आहे. शालेय आणि महाविद्यालयीन शिक्षण,

न्यू ईंग्लिश स्कूलची स्थापना, मराठा आणि केसरी वृत्तपत्राचा उदय या घटनांचे सविस्तर विवेचन केलेले आहे. टिळकांच्या जीवनातील सुरुवातीचे अकरा वर्षे न्यू ईंग्लिश स्कूल, डेक्कन एज्युकेशन सोसायटी, फर्ग्युसन कॉलेज या शिक्षण संस्था स्थापन करण्यात गेली. कोल्हापूर संस्थानच्या प्रकरणामुळे टिळक आणि आगरकर यांना चार महिन्याची शिक्षा होऊन त्यांची रवानगी मुंबईच्या डोंगरीच्या तुरुंगामध्ये करण्यात आली. टिळक, आगरकर यांच्या सुटकेच्या दिवशी तुरुंगाच्या बाहेर दोन हजार लोक जमले होते. अशा प्रकारे सन्मानाचा पहिला अनुभव टिळकांना मिळाला. दादाजी-रखमाबाई प्रकरणामध्ये टिळकांनी दादाजी यांची बाजू उचलून धरली.

दुसऱ्या प्रकरणामध्ये लोकमान्य टिळक यांच्या राजकीय विचारसरणीचा अभ्यास केला आहे. लोकमान्य टिळकांच्या राजकीय विचारांची मीमांसा करतांना स्वराज्य, स्वातंत्र्य आंदोलनाची चतु:सुत्री, राष्ट्रवाद याबाबतचे त्यांचे विचार अभ्यासले. राजकीय स्वातंत्र्याचा प्रश्न एकदा सुटला की सामाजिक, आर्थिक, धार्मिक प्रश्न आपोआप सुटतील असे टिळकांचे मत होते. "स्वराज्य" हे टिळकांचे साध्य होते. स्वराज्य म्हणजे लोकांनी त्यांच्या इच्छेनुसार केलेले स्वत:चे राज्य अशी व्याख्या टिळकांनी सर्वसामान्य जनतेला समजून सांगण्यासाठी केली. स्वातंत्र्याची मागणी करणे म्हणजे राजद्रोह ठरणार होता. मात्र स्वराज्याची मागणी करता येणे शक्य होते. इंग्रजांशी कायद्यानेच भांडले पाहिजे. यावर त्यांचा भर होता. १९१६ साली ॲनी बेझंट यांनी "ऑल इंडिया होमरूल लीग"ची स्थापना केली. टिळक या संस्थाशी संबंधित होते. होमरूल चळवळीला पायबंद घालण्याचे सरकारने प्रयत्न केले. या प्रयत्नाचा एक भाग म्हणून १९१० चा वृत्तपत्रविषयक कायदा करण्यात आला. टिळकांनी दिलेले भाषण हे राजद्रोहात्मक आहे अशी तक्रार गायडर

या पोलीस अधिका-याने केली होती. स्वदेशी आणि बहि:ष्कार या साधनाबरोबरच टिळकांनी राष्ट्रीय शिक्षणाचा समावेश आंदोलनामध्ये केला. स्वराज्याचा हक्क मिळविण्याची राष्ट्रीय जाणीव करून देणारे साधन म्हणून शिक्षणाचा त्यांनी विचार केला. सरकारी शिक्षणातील उपयुक्त शिक्षणाच्या अभावाचा विचार करून राष्ट्रीय शिक्षण देणे कसे महत्वाचे आहे हे सांगितले. भारताचा राष्ट्र म्हणून पुनर्स्थापना करण्याच्या हेतूने राष्ट्रवादाचे विचार सर्वसामान्य राष्ट्रवादाचे विचार सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचविण्याचे कार्य टिळकांनी केले.

तिस-या प्रकरणामध्ये लोकमान्य टिळक यांच्या सामाजिक सुधारणांचा अभ्यास केलेला आहे. टिळक आणि आगरकर हे सार्वजनिक जीवनामध्ये येण्यापूर्वीच १८१८ ते १८८० या कालावधीमध्ये भारतीय समाजामध्ये अनेक बदल झालेले होते. महाराष्ट्राच्याही आधी बंगालमध्ये सामाजिक सुधारणांच्या चळवळी सुरू झाल्या. महाराष्ट्रामध्ये ज्योतिबा फुले (१८२७-१८९०), लोकहितवादी (१८२३-१८९२), गोपाळ गणेश आगरकर (१८५६-१८८९), आणि महादेव गोविंद रानडे (१८४२-१९०१) यांच्या कार्याचा आढावा घेऊन महाराष्ट्रामध्ये आधी सामाजिक की आधी राजकीय या वादाचा विचार केला आहे. टिळकांचे मुख्य ध्येय राजकीय सुधारणा असल्यामुळे, लोकांमध्ये आधी सामाजिक की आधी राजकीय हा गोंधळ न उडता लोकांनी स्वराज्य मिळविण्यासाठी संघटित व्हावे यासाठी आपले विचार वेळोवेळी स्पष्ट केले. शिवाजी महाराज आणि त्यांच्या आधीही गृहस्थिती विशेष चांगली नसतांना राजकीय स्वातंत्र्य मिळविले. इंग्लंड या देशाची ही अशीच परिस्थिती होती. आयर्लंडचे उदाहरण देखील या संदर्भात ते देत असत. टिळकांची सामाजिक सुधारणेविषयीची विचारसरणी अभ्यासण्यासाठी सामाजिक नेते कसे असावेत, धर्मासंबंधी विचारसरणी, अस्पृश्यता निवारण, मद्यपान निषेध, सामाजिक

सामंज्यस, वेदोक्त प्रकरण, जातीभेदाची उत्पत्ती, दुष्काळ व प्लेग यामध्ये केलेले कार्य याचा अभ्यास केला आहे. वरील विषयाच्या अनुषंगाने टिळकांची सामाजिक सुधारणासंबंधीची विचारसरणी तपासून बघितली. पुण्याच्या "नेटीव्ह जनरल लायब्ररी" मध्ये १८७७ मध्ये मद्यपान निषेधक सभा स्थापन करण्यासाठी जाहीर सभा घेण्यात आली. आपल्याकडे मद्यपानाचे पूर्वी व्यसन नव्हते हे टिळकांनी या सभेमध्ये स्पष्ट केले. या सभेनंतर मद्यपान निषेधाच्या चळवळीस सुरुवात झाली. टिळकांच्या भाषणाचा परिणाम म्हणून तरुण मंडळींनी "दारुबंदीची" चळवळ सुरु करण्याचा निश्चय केला. ठिकठिकाणी दारु पिण्याच्या विरोधात लोक शपथा घेऊन लागले. या चळव चळवळीमध्ये सर्व धर्मांच्या लोकांचा समावेश होऊन चळवळीचे स्वरुप व्यापक झाले. मुंबई येथे ११ मे, १८९१ मध्ये प्रांतिक सभेच्या चौथ्या अधिवेशनामध्ये टिळकांनी "शिक्षण व दारुमुक्ते" या विषयीचा ठराव मांडला,होता. दारुबंदीमुळे सरकारचे दारुपासून मिळणारे उत्पन्न कमी होणार होते. म्हणून सरकारने ही चळवळ मोडून काढण्याचा प्रयत्न केला. मात्र टिळकांनी सरकारच्या विरोधात भूमिका घेऊन या चळवळीला अधिक बळकटी आणली.

दारुबंदीच्या चळवळीप्रमाणेच टिळकांनी केवळ सामाजिक कारणासाठी म्हणून दुष्काळ आणि प्लेग यामध्ये कार्य केले. सरकारने १८७६ मध्ये दुष्काळामध्ये "फॅमिन रिलीफ फंड" स्थापन केला होता. त्यानंतर १८९६ मध्ये महाराष्ट्रामध्ये पुन्हा दुष्काळ पडला. या दुष्काळामध्ये टिळकांनी जनतेने आपले अधिकार आणि हक्क वापरावेत म्हणून त्यांना प्रथम केसरीमध्ये (फॅमिन रिलीफ फंडा"चा)सारांश छापला. फॅमिन रिलीफ फंडाच्या माहितीची पुस्तके छापून वाटली. यातील नियमाप्रमाणे दरबारी अधिकारी वागत नसेल तर सभा भरवून सरकारकडे अर्ज करण्यासाठी लोकांना प्रवृत्त केले. सभेचे

प्रतिनिधी निरनिराळ्या ठिकाणी पाठवून दुष्काळी कामे, सारा माफी या संदर्भात सरकारकडे आवेदने पाठविली. राजकीय जागृती लोकांमध्ये तयार करण्याच्या दृष्टीने व चळवळ परिणामकारक ठरली.

महाराष्ट्रामध्ये दुष्काळानंतर प्लेग आला. सरकारने जनतेवर जबर-दस्तीने उपाय लादण्यास सुरुवात केली. टिळकांनी प्लेगच्या जुलुमाबाबत अर्ज लिहिणे, विधायक सूचना करणे, अधिका-याकडे तक्रारी पाठवणे याशिवाय व्यापा-यांकडून पुणे शहरातील दुष्काळ पीडित लोकांकरिता स्वस्थ धान्याची दुकाने काढणे, प्लेगपीडित लोकांसाठी लोकांच्याच प्रयत्नांनी दवाखाने उभारणे इत्यादी कार्ये केली.

चौथ्या प्रकरणामध्ये स्त्रीविषयक सुधारणांचा अभ्यास केलेला आहे. स्त्रियांची सुधारणा झाली की गृहस्थिती बरोबरच समाजस्थिती सुधारते या मताचा सुधारकांनी पुरस्कार केलेला होता. टिळकांचे स्त्रीसुधारणे-विषयी असलेले मत अभ्यासण्यासाठी संमतीवयाचे बील, दादाजी रखमाबाई प्रकरण, शारदासदन प्रकरण, स्त्रीशिक्षण इत्यादी तत्कालिन प्रश्नावर टिळकांनी व्यक्त केलेले विचार तपासून पाहिले. यावरुन असे लक्षात येते की, टिळकांनी स्त्री-सुधारणेला फार मोठा पाठिंबा न देता त्यांच्या सनातनी वृत्तीने मर्यादित स्तरापर्यंत पुरस्कार केलेला आहे. दादाजी-रखमाबाई प्रकरणामध्ये टिळकांना सरकारी हस्तक्षेप मान्य नव्हता. शिवाय बालपणी लग्न झाल्यावर पुढे नवरा आवडत नाही एवढयाच कारणाने हिंदु विवाह परंपरेनुसार स्त्रीला घटस्फोट घेण्याचा अधिकार नसावा. या मताचा पुरस्कार केला. शारदा-सदन प्रकरणामध्ये शारदा-सदर हे ख्रिस्ती मिशन-यांचे आहे. या कारणावरुन त्यांनी प्रचंड विरोध केला. संमति-वयाच्या बिलावर सरकारकडून कायदा होण्यापेक्षा लोकमत काय म्हणते

याचा विचार व्हावा याचा आग्रह त्यांनी धरला. तत्कालिन परिस्थिती-मध्ये लोकमत संमतिवयाच्या बाजूने येणे अशक्य होते. स्त्रीशिक्षण देखील स्त्रियांनी गृहस्थिती सुधारण्यापुरतेच टिळकांनी मर्यादित ठेवले.

टीकात्मक विवेचन -

प्रस्तुत लघुशोध प्रबंधामध्ये टिळक आणि सामाजिक सुधारणांचा टीकात्मक अभ्यास केला आहे. सामाजिक परिषद, संमति वयाचे बील, शारदा-सदन, वेदोक्त प्रकरण या बाबींना टिळकांनी विरोध केला. कॉंग्रेसच्या राष्ट्रीय सभेच्या मंडपात सामाजिक परिषद घेण्यात येऊ नये यासाठी त्यांनी प्रयत्न केले. सुधारक मंडळी प्रसंग पडल्यास आपल्या हट्टा-करिता राजकीय चळवळीत व्यत्यय आणण्यास मागेपुढे पाहणार नाहीत अशी त्यांना भीती वाटत होती. या भीतीपोटीच त्यांनी समाज-सुधारणेचा तत्कालिन प्रश्न उपस्थित झाला की ते तटस्थ न राहता प्रतिकूल टीका करत असत. शिवाय आपले आयुष्य सर्वस्वी राजकीय चळवळीला वाहिले आहे असे टिळकांनी अनेकदा मान्य केलेले आहे. मी समाजसुधारणेच्या विरोधात नाही. मात्र सुधारकांच्या समाजसुधारणेच्या मार्गाला आपला विरोध आहे, असे टिळकांचे सुधारकांच्या बाबतीत मत होते. सुधारकांनी आपला समाजसुधारणेचा आग्रह सोडावा असा आग्रह करतांना मात्र त्यांनी सामाजिक सुधारणेसाठी राजकीय सुधारणा थांबवावी असे कधीही म्हटलेले नाही. टिळकांनी फक्त राजकीय चळवळ हाती घेतली व राजकीय चळवळीत ते मोठया पदाला पोहोचले. सामाजिक सुधारणांना टिळकांनी विरोध केला. तरीही समाजसुधारणा व्हायच्या थांबल्या नाहीत. तरुण पिढीवर टिळकांच्या सामाजिक सुधारणेच्या प्रतिकूल मतांचा फारसा प्रभाव पडलेला दिसत नाही.

टिळक हे अतिशय सनातनी वृत्तीचे होते. हे काही घटनांवरून लक्षात येते. टिळक हे धर्मनिष्ठ असल्यामुळे लोकमताच्या विरोधात यायचे नाही हे कारण पुढे करून त्यांनी ग्रामण्य प्रकरणामध्ये आणि विलायतेची यात्रा केल्यावर त्यांनी प्रायश्चित घेतले. टिळकांनी गणपती उत्सव आणि शिवजयंतीच्या उत्सवामध्ये सर्वच जातीच्या धर्माच्या लोकांचा समावेश केला. याउ उत्सवाच्या माध्यमातून टिळकांनी हिंदु धर्माचे पुनरुज्जीवन करण्याचा प्रयत्न केला. सर्व जातींनी टिळकांचा पुढारीपणा स्वीकारलेला होता. मात्र केसरीकार टिळक आणि व्यक्तिगत टिळक यांतील फरक अस्पृश्यता निवारण्याच्या अखिल भारतीय परिषदेमध्ये लक्षात येतो. वि.रा. शिंदे यांच्या प्रयत्नाने मार्च, १९१८ मध्ये श्री.सयाजीराव गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईला भरलेल्या अस्पृश्यता निवारणाच्या परिषदेमध्ये टिळक वक्ता म्हणून आलेले होते. सकाळच्या बैठकीमध्ये लोक-मान्य टिळक यांनी काँग्रेसचे अस्पृश्यवर्गाचे प्रतिनिधी घेऊन आपल्या कार्यास त्यांचा पाठिंबा मिळवावा अशा आशयाचा ठराव केला. आणि "अस्पृश्यता देवास मान्य असेल तर मी त्यास देव म्हणणार नाही" असे विधान केले. मात्र प्रत्यक्षात जेव्हा अस्पृश्यताविरोधी जाहीरनाम्यावर शिंदे यांनी सही मागितली त्यावेळी त्यांनी शेवटपर्यंत सही दिली नाही.

कोल्हापूरच्या वेदोक्त प्रकरणामध्ये टिळकांनी ब्राह्मण्यांचा पुरस्कार केलेला आहे. श्रीमंत राज्योपाध्ये यांचे इनाम छत्रपतींनी जप्त केल्यावर टिळकांनी केसरीमध्ये लिहिले होते, संस्थानिक दिलेले दान जप्त करत असतील तर संस्थानिकांची राज्ये इंग्रज सरकारला जप्त करण्याला काय हरकत आहे ? छत्रपतीनी राजोपाध्ये यांची इनामे पूर्ववत चालू ठेवावे असे शेवटी त्यांनी या प्रकरणात सुचविलेले होते. मराठ्यांनी वेदोक्त मंत्र म्हटले तरी ते मराठेच राहतील हे लक्षात ठेवले पाहिजे. वेदोक्त कर्मे करणारे ब्राह्मण

पाणी भरतात आणि पुराणोक्त कर्मे करणारे मराठे राजपदाचा अनुभव घेत असतील तर वेदोक्त मंत्रानीच आपले संस्कार व्हावेत असा मराठयांचा आग्रह बरोबर नाही असेही प्रतिपादन टिळकांनी केले होते. थोडक्यात वेदोक्ताचा अधिकार मागणाऱ्या मराठयांची खोटी समजून घालण्याचा प्रयत्न टिळकांनी केलेला होता. वेदोक्तामुळे जर कोणतेच लाभ होत नाहीत तर मराठयांना वेदोक्ताचा अधिकार का नाकारायचा याचे उत्तर टिळकांजवळ नव्हते.

वेदोक्त प्रकरणामध्ये टिळकांची भूमिका पाहता, "बदलत्या काळानुसार शास्त्रामध्ये बदल करावा" या धोरणाशी विसंगत वाटते. राजोपाध्ये यांची इनामे पूर्ववत चालू राहिली पाहिजेत असा त्यांचा आग्रही सुर असल्याचे दिसते. शिवाय वेदोक्त कर्मे केल्यामुळे काही मोठेपणा मिळत नाही, असे एकीकडे विचारात मांडतात आणि दुसरीकडे मात्र ब्राह्मणांच्या वेदोक्तचा अधिकार परंपरागत आहे म्हणून जपतांना दिसतात. टिळक हे समाजामध्ये ब्राह्मणांचे वर्चस्व सिध्द करु इच्छितात या टिळकांवरील आरोपामध्ये तथ्य असल्याचे दिसते.

टिळकांनी काही विषयांना विरोध केला असला तरी मद्यपान निषेध चळवळ, दुष्काळ आणि प्लेगमधील कार्य हे समाजसुधारणेच्या दृष्टिकोनातून महत्वाची ठरतात. संमतिवयाच्या बिलाला टिळकांनी जरी विरोध केलेला असला तरी विधुराना चाळीशीच्या पुढे लग्न करायचे असेल तर विधवेशीच करावे, अशी सूचना मांडलेली होती. टिळकांनी आपल्या घरामध्ये स्त्री विषयक सुधारणा अंमलात आणल्या. त्यांनी आपल्या मुलींना शिक्षण दिले व उशिरा लग्ने करुन दिली. मात्र इतर विषयांना टिळकांनी केलेल्या विरोधामुळे त्यांनी केलेल्या सुधारणा या प्रभावी ठरत नाहीत.

टिळकांच्या सामाजिक सुधारणेचा टीकात्मक अभ्यासाची मीमांसा करताना खालील मुद्याचा विचार करावा लागेल.

१) टिळकांचे मुख्य ध्येय "स्वराज्य" प्राप्ती हेच होते. "प्रखर राष्ट्रवाद" हा टिळकांच्या विचारसरणीचा मुलभूत पाया होता. म्हणूनच राजकीय सुधारणांना त्यांनी अग्रक्रम दिलेला होता. सुधारकांचे नामोहरन करण्यासाठी व ब-याचदा विरोधासाठी विरोध ही भूमिका टिळकांनी स्वीकारलेली होती.

२) टिळक हे व्यक्तिगत जीवनामध्ये सामाजिक सुधारणांच्या विरोधात नव्हते. मात्र सार्वजनिक जीवनामध्ये अपवादानेच सामाजिक सुधारणांना त्यांनी पाठिंबा दिला.

३) टिळक हे धर्मनिष्ठ, सनातनी, संस्कृती आणि परंपरेचा अभिमान बाळगणारे असल्याचे अनेक प्रकरणातून दिसते. त्यामुळे लोकमताच्या विरोधात ते फारसे गेलेले नाहीत. परिणामत: ते लोकप्रिय व लोकमान्य झाले.

४) तत्कालिन समाजामध्ये सामाजिक सुधारणा करण्याचा सुधारकांना विरोध होणे स्वाभाविक होते. याउलट टिळकांचा राजकीय सुधारणेचा मार्ग हा सर्वमान्य होता. त्यामुळेच टिळक हे सुधारकांच्या तुलनेत राजकीय क्षेत्रामध्ये वरच्या पदाला पोहचले.

५) टिळकांनी धर्मा-धर्मामध्ये पारस्पारिक सांमज्यस असावे यावर भर दिला असला तरी ब्राह्मण-ब्राह्मणेत्तर वादाला ते कारणीभूत होते या त्यांच्या वरील आरोपामध्ये तथ्य असल्याचे वेदोक्त प्रकरणामुळे स्पष्ट होते.

वरील विवेचनावरुन असे स्पष्ट होते की, सामाजिक सुधारणा हे

टिळकांचे कार्यक्षेत्र नसले तरीही सामाजिक सुधारणा नको असे त्यांनी म्हटलेले नाही. समाज सुधारणा मान्य आहे मात्र सुधारकांचा सुधारणा मार्ग चुकीचा आहे असे म्हणतांना त्यांनी सामाजिक सुधारणेचा कोणता मार्ग योग्य आहे हे कधीही स्पष्ट केलेले नाही.

......